

शैक्षणिक प्रमाणपत्रे ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध होणार

मुंबई, दि १० मार्च :- केंद्रीय मुनष्यबळ विकास मंत्रालय व विश्वविद्यालय अनुदान आयोग यांच्या डिजीटल इंडियाच्या धोरणानुसार, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक, डॉ.विनोद मोहितकर व सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेडच्या अंतर्गत कार्यरत CDSL व्हेंचर लिमिटेड (CVL) चे कार्यकारी संचालक तथा मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, श्री. जॉयदिप दत्ता यांच्यामध्ये शैक्षणिक प्रमाणपत्रे ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबतचा सामंजस्य करार पार पडला.

सदर सामंजस्य कराराअंतर्गत मंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व पदविका प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थ्यांची सुमारे ९ लाख शैक्षणिक प्रमाणपत्रे राष्ट्रीय शैक्षणिक डिपॉझिटरी (NAD) वर डिजीटल पध्दतीने नोंदणी करुन जतन करुन ठेवण्यात येतील. त्यानंतर NAD मार्फत प्रमाणपत्रातील माहितीची सत्यता, सचोटी, गोपनीयता व सुरक्षतेची पूर्णपणे काळजी घेण्यात येणार आहे. या सेवेद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राची डिजीटल अथवा प्रिंटेड कॉपी विनासायास उपलब्ध होईल तसेच सर्व संबंधित भागधारक व सत्यापकांना NAD मार्फत विद्यार्थ्यांच्या संमतीने ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रमाणपत्रांची सत्यता पडताळून पाहणे शक्य होणार आहे.

या सामंजस्य CDSL चे योगेश कुंदनानी, उपाध्यक्ष, व्यवसाय विकास व श्रीमती ॲमी श्रॉफ, प्रमुख राष्ट्रीय शैक्षणिक डिपॉझिटरी व आंतरराष्ट्रीय संबंध तसेच मंडळाचे प्रधान सचिव, वि.र.जाधव, उप सचिव, डॉ. चं. डि कापसे व सहाय्यक सचिव, आ.शि. आबक उपस्थित होते